# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

पुनविलोकन अर्ज १०३ / २०२२

(मुळ अभिवेदन क्र. ५१ / २०२२ च्या अभिवेदनाबाबत )

नवीन वीज जोडणी वेळेत न मिळाल्याने नुकसान भरपाई मिळण्याबाबत

डॉ. श्री. विश्वनाथ परशुराम सकपाळ.................................................................................................. अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, चिपळूण (महावितरण) ....................................................... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- अनुपस्थितीत

प्रतिवादीतर्फे :- कैलाश पी. लवेकर, कार्यकारी अभियंता, चिपळूण

कोरम :- वन्दना कृष्णा (निवृत्त भा.प्र.से.)

सुनावणी तारीख :- १७ ऑगष्ट २०२२

आदेश पारित दिनांक :- ३० ऑगष्ट २०२२

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम २२ नुसार विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या दिनांक २ जून २०२२ रोजीच्या पारीत आदेशाविरूध्द संदर्भीय अभिवेदन क्र.५१/२०२२ बाबत पुनर्विलोकनासाठी अपिलार्थीनो सदरचे अभिवेदन दिनांक १५ जुल २०२२ रोजी दाखल केलेले आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

२. विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या दिनांक २ जून २०२२ च्या आदेशान्वये अभिवेदन क्रं.५१/२०२२) फेटाळण्यात आल.

३. अपिलार्थींनी आपल्या पुनर्विलोकन अर्जात उपस्थित केलेले मुद्दे संक्षिप्तपणे खाली नमुद केले आहेत.

- अपिलार्थी विश्वनाथ सकपाळ यांनी श्री. आनंद ओक यांना मुखत्यारपत्र दिले आहे व ते भारतीय पुरावा कायदा १८७२ अंर्तगत कायदेशीर दस्तावेज म्हणून गृहीत धरण्यात येते. त्यास कोणत्याही आस्थापनाचे अंर्तगत नियम वरचढ ठरू शकत नाही.
- महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. संकिर्ण २०१९/प्र७१/१८ (र.व.का.) आणि गाऱ्हाणी निवारण्याची कार्यपध्दती बाबतचा विनियम ६.१५ च्या आधार घेऊन सदर अभिवेदन नाकारण्यात आले. आदेशातील अ.क्र.२,३,४ व ५ या आर्थीक मागण्यापैकी एकही मागणी मान्य केलेली नाही व इतर सर्व मागण्या फेटाळण्यात येत आहेत, यातील 'इतर' या शब्दाचा अर्थ स्पष्ट होत नाही.
- प्रतिवादीने अपिलार्थीचे काम लवकरात लवकर कसे पर्ण होईल, हे प्रयत्न केले, परंतू तथाकथीत प्रयत्न माहे डिसेंबर २0२0 नंतरच म्हणजे सात वर्षानी केले, हे वास्तव निदर्शनास आले नाही. श्रीमती जाधव यांचे हरकत पत्र पाहिले तर त्यांच्या बागेतून प्रतिवादी लाईन ओढण्याचे काम करीत होते, त्यामुळे धोका निर्माण होऊन त्यांचे नुकसान होते, असे दिसते. जर बागेतून लाईन नेणे अयोग्य असेल तर ती जबाबदारी प्रतिवादींची आहे. जर प्रतिवादी त्यांच्या मनाप्रमाणे लाईनचे काम करू शकतात असा नियम असेल, तर ती हरकत अपिलार्थींच्या प्रयत्नांनी केव्हाही दूर होणारी नाही. श्रीमती भुवड ह्या अशिक्षित आहेत असा त्यानींच एका अर्जात उल्लेख केलेला आहे. तर, त्यांच्या घरावरून गेलेली लाईन ११ केव्हीएची आहे हे त्यांना कसे समजले?.
- अपिलार्थी याचा वीज जोडणी मागणी अर्ज दिनांक ३१ जानेवारी २0१३ रोजीचा असून, प्रत्यक्षात वीज जोडणी दिनांक ३१ मे २०२२ रोजी देण्यात आली, म्हणजेच, आयोगाने नेमुन दिलेली तीन महिन्यांची मुदत सोडून ४६0 आठवडयांचा विलंबाने वीज जोडणी मिळाली. सबब, कृती मानके २00५ नुसार वीज जोडणीस झालेल्या दिरंगाईबाबत प्रतिवादी जबाबदार आहेत. अपिलार्थींचा तक्रार अर्ज दिनांक ३१ जानेवारी २0१३ रोजीचा असतानाही, तो दिनांक १२ एप्रिल २0१७ चा आहे असे भासविण्यात आले, अपिलार्थींना दिनांक ३0 एप्रिल २0१३ रोजी पर्यत वीज जोडणी देणे गरजेचे असताना सदर अर्जाबाबत दिनांक दिनांक ३0 एप्रिल २0१३ नंतरचे कोणतेही फेरबदल जसे की नोव्हेंबर २0१८ व जानेवारी २0१९ या आदेशाने सौर उर्जा घेण्याबाबतचे शासनाचे निर्णय लागू होत नाहीत परीणामी, अपिलार्थीस दिनांक ५ मार्च २0१९ चे दिलेले पत्र बेकायदेशीर आहे. कृती मानके २00५ च्या विनियम ४.५ नूसार जेष्ठता यादी, ठेकेदार न मिळणे, साहीत्य न मिळणे, ही विलंबाबाबतची कारणे

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

बेकायदेशीर आहेत. वीज जोडणीबाबत केवळ आयोगाच्या नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. प्रतिवादी महावितरणला याबाबतीत स्वतःचे नियम करता येत नाहीत, ही वस्तूस्थिती आहे. श्रीमती जाधव यांनी दिनांक ३ डिसेंबर २०२० रोजी घेतलेल्या हरकतीबाबत अपिलार्थीस तोंडी कळविणे बेकायदेशीर आहे, ही बाब दुर्लक्षीत झालेली आहे.

- वीज जोडणी देण्याबाबत प्रतिवादीने नेमकी कधी सुरवात केली, याची तारीख नमूद केलेली नाही मात्र ऑक्टोबर २०२० पर्यंत प्रतिवादीने जोडणी देण्यासाठी कामकाज केलेले नाही, हे स्पष्ट करणारा खुलासा स्विकारून आदेश पारीत केलेला आहे. ही बाब दुर्लक्षीत झालेली आहे.
- वीज कायदा २००३ मधील कलम १८० च्या उपकलम (१) त्या तरतूदीनूसार शासनाच्या च्या परिपत्रकानूसार हरकत निवारणेची सर्वस्वी जबाबदारी प्रतिवादींची आहे तरी तसे न करता अपिलार्थीस बेकायदेशीरपणे धमकावण्या देऊन जोडणी अडकवून ठेवली व त्यास अपिलार्थीसच जबाबदार धरले जात आहे.
- अपिलार्थी हे सुनावणीसाठी हजर नव्हते. अपिलार्थींनी दिनांक १२ ऑगष्ट २०२२ च्या पत्रान्वये असे नमुद केले की, सदरील पुनर्विलोकन अर्जाच्या सुनावणीसाठी ते हजर राहणार नाही तथापि गुणवत्तेच्या आधारे न्याय निर्णय देण्याची विनंती केली.
- अपिलार्थीने आपल्या अभिवेदनात खालीलप्रमाणे मागण्या केल्या आहेत.
  - पुनर्विलोकनाचा अर्ज मंजूर व्हावा.
  - न्यायमागणीसाठी करावा लागलेल्या खर्चापोटी रु.१५००/- च्या मंजूरोचा आदेश व्हावा.
  - दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजीच्या मंचाच्या आदेशापासून ते दिनांक ३० मे २०२२ पर्यंतच्या एकूण ४१४ दिवसाच्या प्रतिदिनी रु.१००/- प्रमाणे झालेल्या मानसीक त्रासाबाबत रु.४१४००/- भरपाई मिळावी.
  - कृती मानके २००५ मधील तरतूदीनूसार ४६० आठवडयाच्या विलंबापोटी प्रती आठवडा रु.१००/- प्रमाणे रु.४६०००/- भरपाई देण्यात यावी. सदर रक्कम प्रतिवादींकडून व्यक्तीगत स्वरूपात वसूल केली जावी.
  - ग्राहक प्रतिनीधी श्री. ओक यांना विनाकारण दिलेली एकतर्फी समज रद्द करण्यात यावी व इतर न्यायोचीत आदेश व्हावेत.

४. प्रतिवादी यांनी दिनांक २ ऑगष्ट २०२२ रोजी सादर केलेल्या उत्तरातील प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- सदर तक्रार येण्यापर्वा सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले होते, उर्वरीत १० टक्के काम सदरच्या जमीन मालकामुळे अपूर्ण राहीले. त्यास हेतूपुरस्करपणे विलंब केलेला नाही. यावरुन महावितरणचे काम अपूर्ण

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

ठेवण्याचे नाही हे धोरण दिसून येते, अन्यथा २४ पोलचे काम होऊ शकले नसते. सदर कामातील अडथळे दुर करण्यासाठी संबधित शाखाधिकारी, जनमित्र व ठेकेदाराचे कामगार सर्व साहित्यानिशी काम करण्यासाठी गेले असता जमीन मालकाच्या हरकतीमूळे काम अपर्ण राहत होते.

- अपिलार्थींना वीज जोडणी देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या २८ पोल पैकी २४ पोलची वीज वाहिनी व रोहीत्र उभे करण्यात आले. उर्वरीत ४ पोलसाठी सौ. अनिता भुवड यांनी दिनांक २५ डिसेंबर २०२१ रोजी त्यांच्या जागेतून लाईन उभी करण्यास हरकत असल्याचे पत्र सात बारा उतारासह महावितरणच्या गुहागर कार्यालयास दिले. दरम्यानच्या काळात सदर तक्रार येण्यापर्वीच ९० टक्के काम पुर्ण झाले होते. उर्वरीत १० टक्के काम हरकत घेतल्यामुळे प्रलंबित आहे. यावरून महावितरणचे धोरण हे काम पर्ण करण्याचे आहे, त्यामुळे अपिलार्थींचे वीज जोडणी केवळ हरकतीमुळे प्रलंबित राहीली, जाणूनबुजून विलंब केलेला नाही. सदर काम करण्यासाठी संबधित शाखाधिकारी, जनमित्र, ठेकेदाराचे कामगार सर्व साहित्यानिशी गेले असता जमीन मालकांच्या वारंवार हरकतीमुळे अर्धवट सोडून यावे लागले. महावितरणची काम करण्याची मानसिकता नसती, तर २४ पोल उभे राहीले नसते. या कामात अपिलार्थीने महावितरणला सहकार्य करण्याचे सोडून दिशाभूल करून काम कसे लांबणीवर पडेल अशीच कृती केली आहे.
- सुरवातीस प्रथम केलेल्या सर्व्हेनुसार सदर वाहिनी उपलब्ध असणाऱ्या रस्त्याच्या बाजून टाकण्यात येणार होती, परंतू, तेथील जमीन मालकांच्या हरकतीमुळे अन्य पर्यायांचा विचार करण्यात आला. उभे केलेले पोलही काढण्यात आले. अपिलार्थींचे चिरंजीव श्री. विराज सकपाळ यांनी सदर वाहिणी श्री. अनंत भुवड यांच्या जागेतून नेण्याचे सुचविले व सदर मार्गाने हरकत येणार नसल्याचे सांगितले व पोल उभारणीचो जागाही त्यांनीच सुचविली. श्री. भुवड यांच्या हरकतीबाबत महावितरणने दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ रोजी अपिलार्थींस पत्रान्वये कळविले. सदर हरकत मिटविण्याचा महावितरणने वारंवार प्रयत्न केला, परंतू त्यानी हरकत कायम ठेवली. शेवटी महावितरणने माननीय जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे दाद मागितली.
- दिनांक २८ नोव्हेंबर २०२१ रोजी श्री. भुवड यांची हरकत मिटल्याचे पत्र महावितरणला प्राप्त झाले. त्यानुसार महावितरणने काम करण्याची तयारी दर्शविली व शाखा अभियंता रोहीत डांबेराव व बाह्यस्तोत्र कर्मचारी कृष्णा तावडे सदर काम करण्यासाठी पाहणी करण्यास गेले असता, श्री. भुवड यांची सदर कामास हरकत असल्याचे त्यांनी तोंडी सांगितले. सदर अर्ज त्यांनी दिलेला नाही, त्यातील मजकूर त्यांनी न विचारता लिहीला गेला व त्यावर असलेली सही फसवून घेतली असे अपिलार्थीसमोर सांगितले. यावरून सदर अर्ज बनाव असून श्री. भुवड यांना अंधारात ठेऊन त्यांची सही घेतल्याची निदर्शनास येते. सदर अर्जाची नक्कल प्रत अपिलार्थींना मिळाली व ती मंचाच्या सुनावणीमध्ये सादर

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

केली. ती त्यांच्याकडे कोणत्या माध्यमातून पोहचली ही शंकेची बाब आहे. सदर अर्ज अपिलार्थीनेच तयार केलेला असून त्यांनी मंचाची दिशाभूल केली आहे.

- शेवटी काहीही पर्याय नाही, म्हणून वीज कायदा २००३ मधील तरतूदीनुसार अपिलार्थींचे काम पूर्ण करण्यासाठी माननीय जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या अधिकाराखाली सदर विषयावर तोडगा निघण्यासाठी दिनांक २२ डिसेंबर २०२१ रोजी तहसीलदार, गुहागर, यांना पत्रान्वये कळविण्यात आले. यातून महावितरणला अपिलार्थीस वीज देण्याची तत्परता दिसून येते. सदर कामानिमित्त सर्व्हे करण्यासाठी जाण्याकरीता अपिलार्थीच्या सोबत येण्यास सांगितले असता त्यांनी येण्यास नकार दिला. यावरून त्यांची कामात सहकार्य करण्याची मानसिकता नसल्याच दिसते.
- श्रीमती स्मिता जाधव यांनी त्यांच्या हरकतीबाबत दिनांक ३ डिसेंबर २०२० रोजी महावितरणला पत्राने कळविले होते व तसे अपिलार्थीस दिनांक १५ जून २०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले, परंतू, श्रीमती जाधव यांच्या हरकतीबाबत महाराष्ट्र इलेक्ट्रीसीटी वर्क्स ऑफ लायन्ससी, रूल्स २०१२ मधील कलम ६८(३) मधील उपकलम ४ नुसार ११ केव्ही किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या वीज भाराच्या विद्युत उपरी तार मार्ग अथवा एका ग्राहकासाठी वापर होणाऱ्या उपरी तार विद्युत वाहिनी उभारणीसाठी लागू होत नाही, तसेच वीज कायदा २००३ मधील कलम १८० च्या तरतूदीनुसार ११ केव्ही किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या वीज भाराच्या विद्युत उपरी तार मार्ग अथवा एका ग्राहकासाठी वापर होणाऱ्या उपरी तार विद्युत वाहिनी उभारणीसाठी हरकत असल्यास संबधीत खात्याकडे दाद मागितली जावी असा उल्लेख केलेला नाही. सदर हरकती दूर करण्याचा महावितरणकडून वेळोवळी प्रयत्न केला गेला आहे व प्रसंगी दुसऱ्या पर्यायाचाही विचार करून काम थांबणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतली आहे.
- अपिलार्थींना दिनांक ५ मार्च २०१९ रोजी अपारंपारिक (सोलर) उर्जा स्त्रोतातून वीज जोडणी घेण्याची विनंती केली होती, परंतू अपिलार्थीने ती फेटाळून पारंपारिक पध्दतीनेच वीज जोडणीचा अट्टाहास धरला, त्याकरीता २ किमी लांबीची उच्चदाब वाहिनी उभारावी लागणार, याची त्यांना कल्पना आहे. उच्चदाब वाहिनी उभारतांना, त्या त्या जागामालकांची हरकत येणार याचीही त्यांना जाणीव होती. त्याच अनेक जागामालकांचे नुकसान होणार (जागा वाया जाणे, झाडांची छाटणी वा तोडणे, शेतीचे नुकसान) हे अटळ होते. सोलर उर्जा स्त्रोतातून फक्त अपिलार्थींच्या अर्धा गुठांचीच जमिनीचा भाग उपयोगात येणार होता. परतू अपिलार्थींना स्वतःचे नुकसान टाळण्यासाठी (दुसऱ्याचे नुकसान झाले तरीही) पारंपारिक पध्दतीनेच वीज जोडणीचा अट्टाहास धरला. अपिलार्थींच्या हया वर्तनावरून असे निदर्शनास येते की, अपिलार्थींना वीज जोडणीपेक्षा नुकसान भरपाई मिळण्यातच रस आहे.
- मंचाच्या आदेशानूसार अपिलार्थीस दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजी रू.९२/- चा धनादेश देण्यात आला आहे. तसेच कोटेशन देण्यास झालेल्या विलंबाबाबतची भरपाई रक्कम रू.२३८००/- व जागेची पाहणी

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

करण्यास झालेल्या विलंबाबाबतची भरपाई रक्कम रु.१७५००/- असे एकण रु.४१३००/- दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजी धनादेशाद्वारे देण्यात आले. सबब, प्रतिवादीने मंचाच्या आदेशाचे पालन केलेले आहे.

- प्रतिवादीने असे नमुद केले की, व सदर भागामध्ये बाहेर पाऊस पडत असतानाही प्रतिवादींची यंत्रणा युध्दपातळीवर काम करत आहे, तरीसुध्दा सुनावणीचे महत्व लक्षात घेऊन कार्यकारी अभियंता म्हणूण व्यक्तीक्षा सुनावणीसाठी उपस्थित आह. अपिलार्थीने लेखी निवेदनात कोणताही नवीन मुद्दा उपस्थित केलेला नाही. तसेच अपिलार्थी हे सुनावणीसाठी उपस्थित नाहोत. त्यामुळे यंत्रणेचा व न्यायव्यवस्थेचा वेळ वाया गेल्याचे लक्षात येते, हि बाब विचारात घेण्यात यावी.
- अपिलार्थींना वीज जोडणी कामातील सर्व अडथळे दूर झाल्यावर दिनांक ३१ मे २०२२ रोजी देण्यात आली. वीज जोडणी दिनांक ३१ मे २०२२ रोजी दिल्यानंतरहो त्यास वीज पंप जोडणी वा त्याचा वापरही सुरु केलेला नाही.
- अपिलार्थीच अभिवेदन क्र.५१/२०२२ फेटाळलेले आहे. त्यांनी अभिवेदन क्र.५१/२०२२ वरील पुनर्विलोकन अर्जात समज रद्द करण्याव्यतिरीक्त इतर कोणताही नवीन मुद्दा उपस्थित केलेला नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थींचा पनर्विलोकन अर्ज अमान्य करण्यात यावे ही विनंती.
- दिनांक १७ ऑगष्ट २०२२ रोजी व्हिडीओ कॉन्फरंसमार्फत झालेल्या सुनावणीसाठी कार्यकारी अभियंता, महावितरण चिपळूण विभाग, श्री. कैलाश लवेकर उपस्थित होते.

**विश्लेषण व निर्णय.**

५. प्रतिवादीची बाजू ऐकन घेण्यात आली व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन कले. अपिलार्थींच्या वीज जोडणी कामातील सर्व अडथळे दूर झाल्यावर दिनांक ३१ मे २०२२ रोजी प्रतिवदींनी अपिलार्थीस कृषी वीज जोडणी दिली. प्रतिवादींनी असे नमुद केले की, मंचाच्या आदेशानूसार अपिलार्थीस दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजी रु.९२/- चा धनादेश देण्यात आला आहे. तसेच कोटेशन देण्यास झालेल्या विलंबाबाबतची भरपाई रक्कम रु.२३८००/- व जागेची पाहणी करण्यास झालेल्या विलंबाबाबतची भरपाई रक्कम रु.१७५००/- असे एकण रु.४१३००/- धनादेशाद्वारे दिनांक १५ फेब्रुवारी २०२१ रोजी देण्यात आले व प्रतिवादीने मंचाच्या आदेशाचे पालन कलेले आहे.

६. अपिलार्थी यांनी सदर पुनर्विलोकन अर्जात कोणतेही नवीन मुद्दे उपस्थित केलेले नाहीत की, ज्यामुळे मुळ आदेशात बदल करणे गरजेचे आहे. पुनर्विलोकन याचिकेची व्याप्ती ही मर्यादित असते; मात्र, अपिलार्थी या ठिकाणी पुनर्विलोकन याचिकेच्या माध्यमातून संपूर्ण प्रकरणाची पुनश्चः सुनावणी घेण्याची विनंती करीत

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

आहेत, असे, प्रथम दर्शनी दिसते. मात्र, मुळ आदेशांचा आढावा घेण्याचे कोणतेच कारण नव्याने समोर आले नाही.

७. ग्राहक गाऱ्हाणे विनियम, २०20 मधील विनियम २२ मध्ये पुनर्विलोकना बाबत खालील प्रमाणे तरतुद आहे :-

*"२२ विद्युत लोकपालाच्या आदेशाचे पुनर्विलोकन :*

*२२.१ विद्युत लोकपालाच्या आदेशाने बाधीत झालेली कोणतीही व्यक्ति, वितरण परवानाधारकासह, आदेशाच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत अशा आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी त्याच विद्युत लोकपालाकडे खालील परिस्थितीत, अर्ज करील:*

*ए. जेथे कोणत्याही अपिलास प्राधान्य देण्यात आले नाही.*

*बी. अभिलेख्यावरून चूक किंवा दोष असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्यास.*

*सी. एखादी नवीन आणि महत्वाची बाब किंवा पुरावा मिळाला, जो योग्य काळजी घेऊनही तिला ज्ञात नव्हता किंवा जो आदेश पारीत करण्यात आला त्या वेळेस सादर करू शकला गेला नाही.*

*२२.२ अशा पुनर्विलोकनासाठीच्या अर्जात ती बाब किंवा पुरावा, जो योग्य काळजी घेऊनही अर्जदाराला ज्ञात नव्हता किंवा जो आदेश देण्याच्या वेळेस सादर करू शकला गेला नाही, किंवा अभिलेखावरून चुक किंवा दोष असल्याचे सकृतदर्शनी दिसते त्याबाबत, स्पष्टपणे नमुद करण्यात येईल.*

*२२.३ पुनर्विलोकन अर्जासोबत विद्युत लोकपाल निश्चित करेल अशी कागदपत्रे, पुष्टयर्थ माहिती आणि निवेदने जोडण्यात येतील.*

*२२.४ विद्युत लोकपालास जर पुनर्विलोकनासाठी पुरेसे कारण नसल्याचे वाटल्यास, विद्युत लोकपाल असा पुनर्विलोकन अर्ज फेटाळेल.*
*परंतू असे की, अर्जदाराला त्याची बाजु मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणताही अर्ज फेटाळण्यात येणार नाही.*

*२२.५ जर विद्युत लोकपालाचे असे मत झाले की, पुनर्विलोकन अर्ज मंजूर करणे योग्य आहे,*

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

*तर विद्युत लोकपाल तो मंजूर करेल. परंतू असे की, पुनर्विलोकनाचा अर्ज ज्या आदेशाच्या संदर्भात करण्यात आला आहे त्याच्या समर्थनार्थ उपस्थित राहणे व त्याची बाजू ऐकली जाणे शक्य व्हावे म्हणून, विरोधी पक्षकाराला पुर्व-सूचना दिल्याशिवाय असा अर्ज मंजूर केला जाणार नाही. "*

८. संपूर्ण प्रकरणाचा विचार करीता व विनियम २२ मधील तरतुद पाहता, सदरचा पुनर्विलोकन अर्ज फेटाळण्यात येत आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.